# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीसाठी विशेष फिडर सेवा सुरु

## महा मेट्रो आणि एनएमसी संयुक्त उपक्रमाने विद्यार्थ्यांचा प्रवास होणार सुकर




नागपूर: वाठोडा परिसरातील सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजिच्या विद्यार्थ्यांना प्रवासाचे सोपे आणि स्वस्त साधन दिनांक १८ सप्टेंबर पासून उपलब्ध झाले आहे. सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट परिसरात आयोजित कार्यक्रमात सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजिच्या (संचालक) डॉ.नितीन राकेश,(वरिष्ठ सहाय्यक प्राध्यापक) डॉ. रामदास खोमणे, महा मेट्रोचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक श्री. महेश मोरोणे,उपमहाव्यवस्थापक श्री. अखिलेश हळवे, मनपाच्या परिवहन

विभागाचे व्यवस्थापक श्री. घाटोळे,चलो मोबिलिटी ऍपचे श्री. संजय दीक्षित यांनी आपली बस फिडर सेवाला हिरवी झेंडी दाखवित रवाना केले. नागपूर मेट्रो आणि नागपूर महानगर पालिके तर्फे हा संयुक्त उपक्रम राबवलया जात असून या शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात प्रवास करण्यात लाभ होणार आहे.

नागपूर मेट्रोच्या मल्टी मॉडेल इंटिग्रेशन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या फस्ट टू लास्ट माईल कनेक्टिविटी या कार्याशी संबंधित प्रवाश्यांना त्यांच्या गंतव्याच्या जागेपासून मेट्रोपर्यंत जोडण्यासाठी मेट्रो कार्यालय वेळोवेळी अनेक उपक्रम राबवत असतात. घर ते मेट्रो आणि मेट्रो ते घर या दरम्यान लागणाऱ्या वाहतुकीच्या सोयीसाठी महानगर पालिका यांच्याशी संगनमत करून आपली सेवा किंवा शेअर ऑटो सारख्या अनेक सोयी सुविधा आजवर मेट्रोने उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याच अनुषंगाने नागपूर शहरात पुणे येथील मुख्यालय असलेल्या सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीची शाखा पूर्व नागपूरातील वाठोडा भागात ५ वर्षांपूर्वी सुरु झाली व तेथे सिम्बॉयसिस इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि ही अभियांत्रिकी संस्था, विधी विभाग व प्रबंधन विभाग सुरु आहेत. ही युनिव्हर्सिटी महा मेट्रोच्या एक्का मार्गिकेवरील प्रजापती नगर स्टेशनपासून ४ किमी अंतरावर असून तेथे शिकणारे शहरात विविध परिसरात राहणारे बहुतांश विद्यार्थी विद्यापीठात येण्याकरता मोठ्या प्रमाणात स्वतःच्या वाहनांचा वापर करतात. या विद्यर्थ्याचा वेळ,ऊर्जा आणि पैसे वाचावे तसेच त्यांनी सुरक्षित आणि आरामदायक वातावरणात प्रवास करावा या हेतूने त्यांच्यासाठी या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.

महत्वपूर्ण आहे कि, महामेट्रोचे मल्टी-मोडल इंटिग्रेशन (MMI) आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन विभागातर्फे सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि येथे मेट्रो संवाद उपक्रम आयोजित करण्यात आला होता. अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ नितीन राकेश व विद्यार्थी विषयक घडामोडींवर लक्ष ठेवणारे डॉ रामदास खोमणे यांच्या सहकार्याने हा चर्चात्मक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. या दरम्यान झालेल्या चर्चेदरम्यान संचालक श्री नितीन राकेश यांनी मेट्रोचे प्रजापती नगर स्टेशन येथून संस्थेसाठी बससेवा सुरु करण्याचा प्रस्ताव मांडला.

त्यानंतर महामेट्रो, मनपाचे ट्रान्सपोर्ट विभाग व महाविद्यालय यांची संयुक्त बैठक झाली व त्यात संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी प्रजापती नगर मेट्रो स्टेशन पासून विद्यार्थ्यांच्या सोयीकरता आणि त्यांच्या वेळेनुसार सकाळी आणि संख्याकाळी फिडर सेवा सुरु कारण्यासासंबंधीचा निर्णय घेण्यात आला. संस्थेच्या  कॅम्पसपासुन तर प्रजापतीला मेट्रो स्टेशनपर्यंत फीडर बस सेवा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. याची सुरुवात म्हणून सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि येथे मेट्रो आणि महानगर पालिके तर्फे या संपूर्ण उपक्रमाची माहिती देण्याकरता शिबीरचे आयोजन देखील करण्यात आले होते.


FEEDER BUS SERVICE